# आत्मक्लेशाने क्रांती होत नाही

## राजू परूळेकर यांचे प्रतिपादन

पुणे, दि. २७ (प्रतिनिधी)- आंदोलने आणि आत्मक्लेश करून कोणतीही क्रांती होणार नाही किंवा कुणीही महात्मा गांधी बनणार नाही, अशा शब्दात पत्रकार राजू परूळेकर यांनी नाव न घेता अण्णा हजारे यांच्यावर टीका केली.

स्वच्छ भारत, समर्थ भारत, समृद्ध भारत संघटनेच्या वतीने भ्रष्टाचारमुक्त समाज, क्रांतीची नवी दिशा या विषयावरील परूळेकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. स्वच्छ भारत, समर्थ भारत, समृद्ध भारत संघटनेचे विनय हर्डीकर, दिलीप जोशी व शशांक जवळेकर हे यावेळी उपस्थित होते.

परूळेकर म्हणाले, देशाची व्यवस्था ६४ वर्षांपूर्वी बनवली गेली आहे. ती व्यवस्था आता कालबाह्य झाली आहे. देशात नव्या क्रांतीचे वारे वाहत आहेत. संपूर्ण देशात भ्रष्टाचाराविरुद्ध चीड निर्माण झाली आहे. राजसत्ता कमकुवत झाली आहे. उद्योजक असो किंवा सामान्य नागरीक, सर्वांना भ्रष्टाचाराने



ग्रासले आहे. सर्व पक्षांच्या, विचारांच्या लोकांना व्यवस्थेत बदल हवा आहे.

अशा परिस्थितीत इटली किंवा इजिप्तप्रमाणे हिंसेची क्रांती होण्याची वाट पाहण्यापेक्षा लोकांनी एकत्र येऊन अहिंसक मार्गाने क्रांती करून व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अन्यथा देशात अराजकता माजेल, असे सांगून महाराष्ट्राबद्दल बोलताना परूळेकर म्हणाले, देशात क्रांतीचे वारे वाहत असताना महाराष्ट्र मात्र शांत आहे.

भ्रष्टाचार ही मानसिक प्रवृत्ती आहे, ती कधीही संपणार नाही. म्हणूनच जगभरातील कुठल्याही राष्ट्रातून कधीही पूर्णपणे भ्रष्टाचार संपलेला नाही. जनलोकपाल सारख्या कायद्यांनी तो कधीच संपणार नाही. कारण जनलोकपालच्या खुर्चीवर बसणारा अधिकारी देखील माणूसच असणार आहे, त्यामुळे तो भ्रष्टाचार करणारच! कोणताही कायदा करून क्रांती होत नसते. अहिंसक क्रांती कायद्याच्या माध्यमातून होत असते.

महात्मा गांधींनी हे जगाला दाखवून दिले आहे. आंदोलने करून आत्मक्लेश करून व्यवस्था बदलणार नाही, हे त्यांना समजावून सांगण्याची गरज आहे, असे हजारे यांचे नाव न घेता परूळेकर म्हणाले.